**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**सायबर गुन्हे कक्ष**

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ६०८/२०२२ दिनांक :- ०५/०७/२०२२.

# HDFC Credit Card कार्डावरुन फसवणुक झालेली ९३,३२८/- रुपयाची रक्कम तक्रारदाराला परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड परीसरात राहणारे श्री.राजेश वारधानी यांना त्यांचे एचडीएफसी बँकेचे क्रेडिट कार्डातुन कोणताही व्यवहार करता ९३,३२८/- रु कपात झाल्याबाबत दिनांक ०५/०७/२०२२ रोजी मॅसेज प्राप्त झाला. त्यांचे मोबाईवर प्राप्त झाल्याने तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे आवक क्रमांक ९९१-बी/२०२२ दिनांक ०५/०७/२०२२ रोजी चौकशीकामी प्राप्त करण्यात आला होता.

नमुद तक्रारीबाबत सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ दखल घेवुन तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम E-commerce कंपनीच्या माध्यामातुन पुढे वळती झाल्याचे दिसुन आल्याने तात्काळ संबंधीत कंपनीसोबत पत्रव्यवहार करण्यात आला. उपरोक्त पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने तक्रारदार यांची ९३,३२८/- रक्कम त्यांचे खात्यात तात्काळ परत करण्यात आली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी**

- आपल्या बँकेचे स्टेटमेंट, खात्याची शिल्लक वेळोवेळी तपासावेत.
- तसेच बँकेकडुन येणारे मॅसेज यांची माहिती ठेवावी.
- आपल्या बँकखात्याचे संबंधीत माहिती कोणासही देवु नये.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अश्या या प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणुक झाल्यास अथवा असे कृत्य कोणी इसम करीत असल्यास आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईन संपर्क साधुन तक्रारी द्यावी.

सदरची कामगिरी मा. श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. अमोल मांडवे,सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजिकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल,श्री. स्वप्नील वाव्हळ, सपोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ माधुरी धिंडे, यांनी केली असुन यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे कक्ष संपर्क क्रमांक :- ०२२-२८११-०१३५
सायबर गुन्हे कक्ष व्हॉटसअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

- सायबर गुन्हे कक्ष ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**